## ॥ श्री अनिरुद्धोपासना ॥

## ॥ ॐ मन:सामर्थ्यदाता श्रीअनिरुद्धाय नम: ॥ (11)

## ॥ ध्यानमंत्र ॥

पद्मासीनं श्यामवर्णं सहस्त्रशीर्षं शुभांगम् । सहस्त्राक्षं सर्वरूपं मन:सामर्थ्यदायकम् ।
पापतापहरं शान्तं अभयमुद्राधारिणम् । भक्तप्रियं सौम्यरूपं अनिरुद्धं नमाम्यहम् ।

## ॥ श्री मारुती स्तोत्र ॥

भीमरुपी महारुद्रा, वज्रहनुमान मारुती । वानरी अंजनीसूता, रामदूता प्रभंजना ॥१॥
महाबळी प्राणदाता, सकळां उठवी बळें । सौख्यकारी दु:खहारी, दूत वैष्णवगायका ॥२॥
दीननाथा हरीरुपा, सुंदरा जगदंतरा । पातालदेवताहंता, भव्यसिंदूरलेपना ॥३॥
लोकनाथा जगन्नाथा, प्राणनाथा पुरातना । पुण्यवंता पुण्यशीला, पावना परितोषका ॥४॥
ध्वजांगे उचली बाहॊ, आवेशे लोटला पुढे । काळाग्नि,काळरुद्राग्नि, देखतां कांपती भयें ॥५॥
ब्रम्हाडें माइली नेणों, आंवळे दंतपंगती । नेत्राग्नि चालिल्या ज्वाळा, भ्रुकुटी ताठिल्या बळे ॥६॥
पुच्छ तें मुरडिलें माथा, किरीटी कुंडलें बरी । सुवर्णकटिकांसोटी, घंटा किंकिणि नागरा ॥७॥
ठकारे पर्वताऐसा, नेटका सडपातळू । चपळांग पाहतां मोठे, महाविद्युल्लतेपरी ॥८॥
कोटिच्या कोटि उड्डाने, झेंपावे उत्तरेकडे । मंद्राद्रीसारिखा द्रोणू, क्रोधे उत्पाटिला बळें ॥९॥
आणिला मागुता नेला, आला गेला मनोगती । मनासी टाकिलें मागें, गतीसी तुळणा नसे ॥१०॥
अणूपासोनि ब्रम्हांडायेवढा होत जातसे । तयासी तुळाणा कोठें, मेरुमांदार धाकुटे ॥११॥
ब्रम्हांडाभौंवते वेढे, वज्रपुच्छें करु शके । तयासी तुळणा कैची, ब्रम्हांडी पाहतां नसे ॥१२॥
आरक्त देखिले डोळां, ग्रासलें सूर्यमंडळा । वाढतां वाढतां वाढे, भेदिलें शून्यमंडळा ॥१३॥
धनधान्यपशुवृद्धि, पुत्रपौत्र समग्रही । पावती रुपविद्यादि, स्तोत्रपाठेंकरुनियां ॥१४॥
भूतप्रेतसमंधादि, रोगव्याधि समस्तही । नासती तुटती चिंता, आनंदे भीमदर्शने ॥१५॥
हे धरा पंधराश्लोकी, लाभली शोभली बरी । दृढदेहो निसंदेहो, संख्या चंद्रकळागुणे ॥१६॥
रामदासी अग्रगणू, कपिकुळासि मंडणू । रामरुपी अंतरात्मा, दर्शनें दोष नासती ॥१७॥

## ॥ श्री अनिरुद्ध महिमा ॥

अनिरुद्धे जयाची बुद्धी स्थिर । तयासी कैसे ताप दुस्तर । दर्शने सहजी हरेल फिकीर । भोग प्रखर नासती ॥
व्यापकत्व ऎसे अनन्त । कुठेही जरीही एकान्त । वा मिळविला लोकान्त । जाणितॊ वर्म सकळांचे ॥
केवळ एक दृष्टिपात । क्षणात होई पापाघात । टळेल जन्माचे दुरित । ढीग जाळीत कुकर्माचे ॥
एकही शब्द न उच्चारिता । आशिषस्पर्श न करिता । देते अर्थ पूर्णचरिता । कृपासरिता तयाची ॥
करावया मनुजोद्धार । पातला हा धरणीवर । सगुणरुप पूर्णावतार । भक्ताधार सर्वस्वी ॥
क्रमून चौऱ्याऎंशी लक्ष योनि । होतो मानव सर्व फिरुनि । लागता अनिरुद्धाचे चरणी । कृतार्थ जीवन लाधतो ॥
नित्य सांगतसे एक ऎकावे । प्रपंची सदैव धर्मे असावे । प्रेमे जन्माचे सार्थक करावे । सावध रहावे नामस्मरणी ॥
आनंदाचा हा महासागर । प्रेम कृपा अपरंपार । करीन रक्षण निरंतर । कैवल्य अपार दावतो ॥
किंचितही मागील पुण्य नसेल । तरीही जो हे चरण वरेल । अनिरुद्ध अनिरुद्ध सदा वदेल । मार्ग पावेल सहजता ॥
श्रद्धा नाही भक्ती नाही । अज्ञानाची गोणी वाही । अपघाते जरी हे चरण पाही । त्यासही रक्षी संकटी ॥
करा श्रम गाळा घाम । घ्या सदा हरिगुरुनाम । हाच असे श्रेष्ट नियम । उच्चरवे संगतसे ॥
प्रत्येका लागे मन समर्थ । झाले सर्व खटाटोप व्यर्थ । अनिरुद्धाचे वचन तदर्थ । सदैव मनी स्मरावे ॥
तू आणि मी मिळून पाही । अशक्य असे काहीही नाही । देतो मुक्तकंठे ग्वाही । राजाधिराज अनिरुद्ध ॥
सर्व शक्तींचे मूळ मानसी । त्याची समर्थता कधी न गवसी । स्मर अनिरुद्धाचे महावाक्यासी । समर्थदाता हाचि असे ॥

आज्ञापालन सेवा नियमन । नामसंकीर्तन अधिध्यासन । हेचि जाणावे तपसाधन । सुगम संपन्न सहजचि ॥
श्रद्धा राखावी निखळ । मन करावे निर्मळ । सेवा करावी सकळ । प्रपंच बख्खळ होईल ॥
नाही त्यागावी दारा । नाही सोडावे घरा । तरीही पावावे परमार्था । अनिरुद्ध नामे ॥
अर्थ अनर्थ मी न जाणतो । योग्य अयोग्य न ओळखतो । चरण तुझे मी धरतो । सांभाळी आता ॥
नावडे मज ग्रंथज्ञान । नको मज मानसन्मान । दशेंद्रिय अकरावे मन । करितो अर्पण तव चरणी ॥
जे जे मजसाठी उचित । तेचि तू देशील खचित । हे मात्र मी नक्की जाणीत । नाही तकरार राघवा ॥
अरे देवा सद्गुरुराया । आनंदघना निरामया । सगुणब्रह्म भक्तसखया । पाहि माम् पाहि माम् ॥

## ॥ श्लोकी ॥

हरिरुप अनिरुद्धे पृथ्वीतत्वासी आले । हरतत्व अनिरुद्धे मायोपाधित झाले ।
भयदु:ख अनिरुद्धे सज्जनांचे पळाले । बोल बोल वाचे श्रीअनिरुद्ध आले ॥
अत्यंत प्रीती नामे भजन शुद्ध भावे । करावे सदा रंगरंगूनी स्वभावे
अनिरुद्धस्तवनातें मन रंगवावे । पाप ताप जळती अनळ सहज भावे ॥
सकल दुष्ट बीजे नासती मानसीची । अखिल संत मीते नाचती सहस्त्रीची ।
अनिरुद्ध नाद जैसा उठे अंतरीचा । सुखानंद कंद तैसा होय जीवनाचा ॥
जगी नाचते सैन्य ते दानवांचे । शिरी लाविती मुंडके सज्जनांचे ।
तुझिया पदी अर्पितो शुद्ध भाव । खलमर्दनाचा जाणूनी तुझा माव ॥
तव कृपा कवणाही दूर कधी करेना । जाणूनी असंख्य पापे क्रोध कधी धरेना ।
पदकमळ वंदाया सर्व सृष्टी निघाल्या । अनिरुद्ध पाहताना सर्व दृष्टी निमाल्या ॥

## ॥ श्री बापूंची आरती ॥

आरती अनिरुद्धा, प्रभू पूर्णब्रह्म शुद्धा, प्रभू पूर्णब्रह्म शुद्धा,
कृपाकटाक्षे सुखविसी, कृपाकटाक्षे सुखविसी मज पूर्णानंदा ।
ॐ जय जय अनिरुद्धा ॥
अज्ञानाचा नाश करुनि तू प्रकटविसी ज्ञाना ।
पापशुद्धीचा मार्ग दावूनी, पापशुद्धीचा मार्ग दावूनी संपविसी भोगा ।
ॐ जय जय अनिरुद्धा ॥
भक्तिरसाचा उद्गाता तू प्रगटलासी रामा । प्रभू प्रगटलासी रामा।
सद्धर्माचा बाण सोडूनि,सद्धर्माचा बाण सोडूनि, मारिसी कलिकाला ।
ॐ जय जय अनिरुद्धा ॥
स्वयंप्रकाशी स्वयंतेज तू घननीळा कृष्णा । प्रभू घननीळा कृष्णा ।
असंख्य क्रीडा लीला करुनि, असंख्य क्रीडा लीला करुनि पुरविसी सत्कामा ।
ॐ जय जय अनिरुद्धा ॥
अफाट शक्ती पूर्णपुरुष तू, देसी पुरुषार्था । प्रभू देसी पुरुषार्था
तुझिया चरणी भाव अर्पूनि, तुझिया चरणी भाव अर्पूनि, मी झालो तुझा ।
ॐ जय जय अनिरुद्धा ॥